**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA**
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 0231 2609091, 2609135 Website : www.unishivaji.ac.in E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit:(1) Affiliation → Affiliation T2 Circulars (2) Affiliation → Affiliation T2 Information Lists
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र**
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१ ०२३१ २६९१५३३ व ००९१ ०२३१ ६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१, २६०९१३५

Estd : 1962
"A++" Accrediated by NAAC (2021) With CGPA 3.52

संदर्भ क्र. शिवाजी वि/संलग्नता/टी-२/परिपत्रक/ दि. 09 JUN 2023

No 598

## :: परिपत्रक ::

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय :- नॅक मुल्यांकन / पुनर्मुल्यांकनाबाबत...
संदर्भ :- १. मा.प्र.शिक्षण (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून आलेले पत्र संदर्भ क्र.एनजीसी/ २०२२ /नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि ३/६७८ दि.२५/०१/२०२३ रोजीचे पत्र.
२. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे संदर्भ क्र.एसयु/अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष/३१ दि.०४/०२/२०२३ रोजीचे पत्र.
३. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे संदर्भ क्र.एसयु/अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष/६० दि.०५/०६/२०२३ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. १ नुसार मा. प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधामध्ये वाढ होणे व शैक्षणिक गुणात्मक दर्जा वाढीसाठी सर्व महाविद्यालयांनी नॅक मुल्यांकन व पुनर्मुल्यांकन करुन घेणे आवश्यक आहे. तसेच वेळोवेळी निर्देश देवूनही महाविद्यालयांनी नॅक मुल्यांकन व पुनर्मुल्यांकन करुन घेतलेले नाही हि बाब शैक्षणिकदृष्ट्या योग्य नाही. यास्तव सर्व महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन व पुनर्मुल्यांकन प्रक्रिया तात्काळ सुरु करुन दि.३१ मार्च, २०२३ पर्यंत नॅक मुल्यांकन व पुनर्मुल्यांकन प्रारंभ टप्यातील संस्था नोंदणी (HEI Registration) करुन IIQA (Institutional Information for Quality Assessment) नॅक कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे. या दिनांकापर्यंत IIQA सादर न केल्यास शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता प्रथम वर्षाच्या प्रवेशास निर्बंध लागू करणेबाबत शासनास प्रस्तावित करण्यात येईल असे कळविले होते. त्यानुसार आपणास विद्यापीठामार्फत संदर्भिय पत्र क्र. २ व ३ नुसार ज्या महाविद्यालयांच्या नॅक मुल्यांकन / पुनर्मुल्यांकनाची वैधता संपुष्टात आलेली आहे अशा सर्व महाविद्यालयांनी मा.प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), पुणे यांनी कळविलेनुसार तात्काळ कार्यवाही करुन केलेल्या कार्यावाहीचा अहवाल संचालक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना सादर करावा असे कळविण्यात आले होते. तथापि, आपणाकडून याबाबतचा अहवाल या विभागास प्राप्त झालेला नाही. सदरची बाब अतिशय गंभीर स्वरूपाची आहे.

उपरोक्त बाब विचारात घेता आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की,

१. ज्या महाविद्यालयांच्या नॅक मुल्यांकन/पुनर्मुल्यांकनाची वैधता संपुष्टात आलेली आहे अशा महाविद्यालयांमध्ये प्रथम वर्ष प्रवेश व संलग्नीकरणाची बाब विद्यापीठ अधिकार मंडळाच्या विचाराधीन असून विद्यापीठ अधिकार मंडळाचा निर्णय आपणास बंधनकारक असेल याची कृपया नोंद घेण्यात यावी.
२. ज्या महाविद्यालयांच्या नॅक मुल्यांकन/पुनर्मुल्यांकनाची वैधता संपुष्टात आलेली आहे व त्यांनी IIQA (Institutional Information for Quality Assessment) नॅक, बेंगलोर यांच्या कार्यालयास अद्यापी सादर केलेला नाही अशा सर्व महाविद्यालयांनी आपला याबाबतचा स्वयंस्पष्ट वस्तूनिष्ठ अहवाल संचालक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना **तात्काळ** सादर करणे बंधनकारक आहे.
३. उपरोक्त संदर्भ क्र.१, २ व ३ च्या पत्रानुसार विद्यापीठास ज्या महाविद्यालयांनी माहिती पाठविली नाही, त्यांनी माहिती का पाठविली नाही याबाबतचा खुलासा व आपल्या महाविद्यालयाचे संलग्नीकरण का थांबवू नये याबाबतचा खुलासा **तात्काळ** सादर करावा.

कळावे.

आदेशान्वये
श्री विलास एस सोयम
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत :- वरीप्रमाणे.

D:\SSV\Circular (1).docx